Gomantak Times 25/1/04

# 'एज्युकॉन'ने निर्माण केले डिजिटल विद्यापीठांचे चित्र

वार्का, ता. २५ : विद्यापीठ आवारात लॅपटॉप घेऊन वावरणारे विद्यार्थी, आवारात कोठेही बसून इंटरनेटद्वारे त्यांचा शिक्षकांशी चाललेला संवाद, सर्व प्रशासकीय यंत्रणेत माहिती तंत्रज्ञानाचा वापर आणि त्यामुळे सुलभ झालेले काम...

माहिती तंत्रज्ञानाचा (आयटी) सुयोग्य वापर केल्यास येत्या काळात देशातील किमान काही विद्यापीठे तरी अशी दिसतील. 'सकाळ'ने आयोजिलेल्या यूजीसी कुलगुरू परिषदेत आयटी क्षेत्रातील दिग्गज कंपन्यांनी भविष्यकालीन डिजिटल विद्यापीठांचे चित्र 'एज्युकॉन ०४' या कार्यक्रमात सादर केले आणि देशातील काना-कोपऱ्यांतून आलेले कुलगुरूही क्षणभर स्तिमित झाले, आणि म्हणूनच प्रत्येक वक्त्यांच्या व्याख्यानानंतर मिळत होता उत्स्फूर्त प्रतिसाद. कुलगुरू परिषदेच्या आजच्या दुसऱ्या दिवशी इंटेल, आयबीएम, सन मायक्रोसिस्टिम्स आणि डायमेन्शन्स सायबरटेक या कंपन्यांनी शिक्षणासाठीही आयटी



रमाडा रिसॉर्टमध्ये सुरू असलेल्या कुलगुरू परिषदेत बोलताना इंटेल इंडियाचे संचालक डॉ. अंजन घोष. सोबत कॅनडातील आयबीएम कंपनीच्या ज्युडीथ एस्कॉट. (छाया : आनंद )

उत्पादनांबाबत सादरीकरण केले आणि तंत्रज्ञानाद्वारे शिक्षणाचा दर्जा कसा उंचावता येईल, याची माहिती दिली. शिक्षक आणि तंत्रज्ञान अशी सांगड घातल्यास शिक्षणाचा चेहरा - मोहराच बदलून जाईल, असे नमूद करीत इंटेलचे डॉ. अंजन घोष यांनी इंटेलच्या तंत्रज्ञानाची माहिती दिली. माहिती आणि दूरसंचार तंत्रज्ञानाबाबत (आयसीटी) शिक्षणसंस्थांसाठी स्वतंत्र धोरण असण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. व्याख्यानानंतर विविध कुलगुरूंनी त्यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली. बहुराष्ट्रीय कंपन्या प्रामुख्याने 'आयआयटी'सारख्या शिक्षणसंस्थांना डोळ्यासमोर ठेवून उपक्रम राबवितात, अशी तक्रारही काही कुलगुरूंनी केली. नंतरच्या सत्रातही 'ओपन' सोर्सिंग', इंटरनेटद्वारे दूरशिक्षण, ई-कंटेंट, कॅम्पस व्यवस्थापनासाठी 'ईआरपी'प्रणाली आदींबद्दलची माहिती देण्यात आली. सर्वसाधारण विद्यापीठांनाही या बाबी उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव बहुतेक कुलगुरूंनी मांडला. विद्यापीठासारख्या उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांत एकाच वेळी अनेक प्रक्रिया घडत असतात. अध्ययन - अध्यापन, संशोधन, प्रशासन या सर्वांना 'आयसीटी' तंत्रज्ञानाच्या धाग्याने जोडता येणे शक्य असल्याचे आजच्या चर्चासत्रात स्पष्ट करण्यात आले. यामुळे प्रवेश प्रक्रियेपासून परीक्षेपर्यंत आणि केवळ चार भिंतीच्या वर्ग, खोल्यांतच नव्हे तर कॅम्पसमधील झाडाखालीही संगणकाचा वापर करून डिजिटल विद्यापीठ उभारता येत असल्याचेही उदाहरणांसह स्पष्ट करण्यात आले. "हा आमच्यासाठी एक वेगळा अनुभव होता. अशा प्रकारच्या नवनव्या तंत्रज्ञानाची कुलगुरूंना माहिती होणे आणि त्यांनी ते प्रत्यक्षातही आणणे आवश्यक आहे," अशी भावना काही कुलगुरूंनी 'सकाळ'समूहातील पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली.